।। सबका मालिक आत्मा ।।



## आत्मा (SOUL)

।। हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ।।

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।।ॐ गुरुदेव।।

# आत्मा मालिक

जून-२०२६

## ॥ सबका मालिक आत्मा ॥



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व–रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २५ वे अंक ६ वा जून २०२६ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - आत्मा काय आहे? - संत परमानंद महाराज ४

श्रीज्ञानदेवांच्या मौनाचा परम अर्थ -डॉ. विजय बाणकर ६

माऊलींचा अमृतानुभव (भाग १) - नामदेव सदावर्ते १०

कळस -बंडोपंत कुलकर्णी १४

ऐसी कर्मगती : ऐसा ध्यानी ज्ञानिया- भाग ६ - डॉ. सुनील शिंदे १७

दक्षिण भारत सत्संग यात्रा २००५ आणि २००९ -बी. के. गायकवाड २०

विश्वात्मक सद्गुरूदेव : चेतना की अखंड महायात्रा - नरेश यादव २४

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## आत्मा काय आहे?



**संपादकीय**

**आजच्या समाजात मान्य असलेली आत्मकल्पना ही भगवद्गीतेतील आहे. देहापासून आत्मा अत्यंत भिन्न आहे. आत्म्याला मरण नाही. जुनी वस्त्रे टाकून देऊन ज्याप्रमाणे आपण नवी परिधान करतो, त्याप्रमाणे देहनाशानंतर आत्मा नवीन देह धारण करतो. आत्म्याला शस्त्रे तोडीत नाहीत, अग्नी जाळीत नाही आणि पाणी भिजवीत नाही. त्याला कोणी निर्माण केले नाही, त्याच्यात कोणतेही विकार घडत नाहीत आणि त्याचा नाशही होऊ शकत नाही. इंद्रियद्वारा त्याचे स्वरूप कळणार नाही, कारण तो जड नाही. अशा तऱ्हेची गीतेतील आत्मकल्पना आहे.**

**-संत परमानंद महाराज**

**आ**त्मा हा शब्द 'अत्' (सतत चालत राहणे) अथवा 'अप्' (व्याप्त होणे) या धातूंपासून बनला आहे, असे निरुक्तात म्हटले आहे. प्राचीन मानवाची अशी श्रद्धा होती, की प्रत्येक मनुष्याच्या जीवनव्यापारांचे नियंत्रण करणारी एक शक्ती त्या त्या मनुष्याच्या ठिकाणी असते. ही शक्ती म्हणजे भौतिक दृष्टीस दिसणाऱ्या त्या व्यक्तिचेच एक सूक्ष्म रूप होय, अशी कल्पना होती. स्वतःचे पाण्यात दिसणारे प्रतिबिंब, मृत व्यक्तीचे स्वप्नात घडणारे दर्शन, दृष्टिभ्रमाने डोळ्यांसमोर भासणारी एखादी पुसट आकृती, अशांसारख्या घटनांनी व्यक्तीच्या अंतर्यामी असणाऱ्या प्रतिव्यक्तीच्या कल्पनेला पुष्टी मिळे. ही प्रतिव्यक्तीची कल्पना म्हणजेच मानवेतिहासात आत्मा या संकल्पनेची सुरुवात होय. व्यक्तीचा आत्मा त्या सबंध व्यक्तीला व्यापून असतो या अर्थाने 'अप्' = व्याप्त होणे या धातूपासून त्याची व्युत्पत्ती सांगणे योग्यच ठरते. तसेच व्यक्तीच्या प्रत्येक कृतीचा प्रेरक या अर्थाने तो सतत गतिमान असतो. या दृष्टीने 'अत्'= सतत चालणे या धातूपासून सिद्ध केलेली व्युत्पत्तीही समर्पक मानता येते. मृत्युसमयी आत्मतत्त्व मनुष्याला सोडून जाते अशी कल्पना करणे तर्कसंगत आहे. मृत्यूनंतर श्वासोच्छ्वास थांबतो किंबहुना शेवटचा श्वास सोडणे म्हणजेच मृत्यू होय, हीही गोष्ट स्पष्ट आहे. यावरून व्यक्तीला व्यापून राहणारा आत्मा हा श्वसन-वायुरूप आहे अशी कल्पना होऊ शकते. या कल्पनेचे प्रतिबिंब आपल्याकडील प्राण शब्दांशी दिसते. प्र+अन् (श्वासोच्छ्वास करणे) या धातूपासून प्राण शब्द बनला आहे. म्हणून अन् या धातूचा संबंध 'आत्मन्' या शब्दाशी असू शकतो. श्वास (वायुदेवतेचा) या अर्थाने ऋग्वेदात आत्मन् हा शब्द चार वेळा आलेला आहे.

देहाच्या अंतर्यामी राहून त्याचे नियंत्रण करणारे असे देहभिन्न आत्मतत्त्व आहे, या संकल्पनेला काही तार्किक कार्यही आहे. व्यक्तीजीवनात एकसारखे विकार घडत असतात, तरी व्यक्ती ही तीच राहते. विकार घडत असताना काहीतरी अविकृत अथवा नित्य असे असतेच, अशी आपली धारणा असते. त्या नित्य तत्त्वाचा निर्देश आत्मा याने होतो. तसेच व्यक्तीचा अनुभव बहुमुखी असतो. सुख आणि दुःख, पाहणे आणि ऐकणे, प्रेम आणि द्वेष अशा तऱ्हेचे अनुभव अनेक असले, तरी ते अनुभव घेणारी व्यक्ती

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

एकच असते. अनेक अनुभवांत अनुस्यूत असणारी ही एकता आत्मा या संकल्पनेने व्यक्त केली जाते. आत्मा म्हणजे द्रव्य असा अर्थ होत असला, तरी तो गौण होय. त्याचा मुख्य अर्थ देहभिन्न असा 'मी' अथवा 'अहं' पदार्थ हाच होय. असा एक पक्ष घेता येतो, की कोणताही अनुभव येत असताना मला माझ्या 'अहं'चा अथवा आत्म्याचा प्रत्यय येत असतो व ज्याला हा अनुभव येतो, तोही 'अहं' अथवा 'मी' होय. सर्व अनुभवांचे अधिष्ठान असा जो मी अथवा माझा आत्मा, त्याचे स्वरूप काय यासंबंधीची मीमांसा करण्याचा प्रयत्न फार प्राचीन काळापासून माणसाने केला आहे.

उपनिषदांचा यासंबंधीचा प्रातिनिधिक विचार असा आहे, की आत्म्याला जन्मही नाही व नाशही नाही. तो निरवयव, क्रियाहीन, निर्गुण व बोधरूप आहे. जड विश्वाच्या अंतर्यामीही तेच आत्मतत्त्व आहे. आपला आत्मा विश्वात्म्याशी एकरूप आहे, हा अनुभव घेतल्याने अमृतत्व मिळते, अशा तऱ्हेच्या प्रगल्भ आत्मविचाराबरोबर उपनिषदांत तो पुरुष (आत्मा) अंगठ्याएवढा आहे किंवा तो डोळ्यांच्या बुबुळांत राहतो, अशा तऱ्हेच्या आत्मस्वरूपासंबंधी अगदी प्राथमिक कल्पनाही आढळतात.

न्याय व वैशेषिक या दर्शनांतून जीवात्मा विभू म्हणजे सर्वत्र, सर्वकाली असणारा असा मानला आहे. ज्ञान अथवा बुद्धी हा आत्म्याचा गुण आहे, स्वरूप नव्हे. नैयायिक हे आत्म्याचे मानसप्रत्यक्ष होते असे मानतात, तर वैशेषिकांच्या मते त्याचे अस्तित्व अनुमानाने समजते. बुद्धी हा गुण ज्या अर्थी प्रत्यक्षात उपलब्ध आहे, त्या अर्थी त्या गुणाला आश्रय असणारे आत्मा हे द्रव्य असले पाहिजे, असे ते अनुमान आहे. ज्ञानरहित अवस्थेत, आत्मा असू शकतो किंबहुना असा जाणीवरहित आत्मा हा काष्ठपाषाणाप्रमाणे जडच होय, तो आत्मा नसून अनात्माच होय, असा आक्षेप नैयायिकांच्या आत्मकल्पनेवर घेतला जातो.

सांख्य आणि योग या दर्शनांतून आत्म्याला 'पुरुष' अशी संज्ञा आहे. पुरुषात कोणतेही विकार घडत नाहीत. ज्ञानप्रक्रिया जड अंतःकरणात घडते, त्या प्रक्रियेचा पुरुष केवळ साक्षी असतो. तो तटस्थपणे पाहतो. कोणत्याही तऱ्हेचे कर्तृत्व त्याला नाही. सुखदुःखांचे भोग हेही वास्तविक जड प्रकृतीचेच. पुरुष निर्लेप, उदासीन आणि केवल आहे. हा केवलपणा उमगणे म्हणजेच कैवल्य अथवा मोक्ष होय.

आजच्या समाजात मान्य असलेली आत्मकल्पना ही भगवद्गीतेतील आहे. देहापासून आत्मा अत्यंत भिन्न आहे. आत्म्याला मरण नाही. जुनी वस्त्रे टाकून देऊन ज्याप्रमाणे आपण नवी परिधान करतो, त्याप्रमाणे देहनाशानंतर आत्मा नवीन देह धारण करतो. आत्म्याला शस्त्रे तोडीत नाहीत, अग्नी जाळीत नाही आणि पाणी भिजवीत नाही. त्याला कोणी निर्माण केले नाही, त्याच्यात कोणतेही विकार घडत नाहीत आणि त्याचा नाशही होऊ शकत नाही. इंद्रियद्वारा त्याचे स्वरूप कळणार नाही, कारण तो जड नाही. अशा तऱ्हेची गीतेतील आत्मकल्पना आहे. या आत्म्याचे ध्यान केल्यास त्याच्या माध्यमातून मुक्ती मिळू शकते, असे सद्गुरू सांगतात. म्हणून प्रत्येकाने या आत्मचिंतन करून आपल्या मोक्षपदाची वाट सुकर करून घ्यावी.

**|| आत्मा मालिक ||**

**-संत परमानंद महाराज,**
संपादक

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



## श्रीज्ञानदेवांच्या मौनाचा परम अर्थ

**परमात्मा म्हणजे देव हा कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांच्या सर्व कर्मांहून कसा सदैव अलिप्त असतो, ते या निरुपणांत आपल्याला स्पष्ट होते. उदा. त्वगिंद्रियाहून, घ्राणेंद्रियाहून व श्रवणेंद्रियाहून तो चित्स्वरूप असल्याने अविकारी असतो, रसनेंद्रियाहून तो आत्मा स्वानंदपूर्ण असल्याने रसातीत असतो, चक्षुरिंद्रिय, त्याचा दृश्य हा विषय व पाहण्याची क्रिया या सर्वांचाही प्रकाशक असलेला असा तो आत्मा**

**- डॉ. विजय बाणकर**

'ज्ञानदेवां (मौन्य) मौन जपमाळ अंतरीं। धरोनि श्रीहरी जपे सदा ।।', असे संत श्रीज्ञानदेव यांनी आपल्या हरिपाठांत म्हटले आहे. हरिपाठातील त्यांच्या या म्हणण्याचा सरळ अर्थ अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. उदा. 'मी सर्व प्रपंचाविषयी मौन स्वीकारून, अंत:करणांत श्रीहरिचे प्रेम धारण करून व हातामध्ये जपमाळ धारण करून मुखाने नामस्मरण करीत आहे', असे माउली ज्ञानोबाराय म्हणतात, असा एक अनुवाद केला गेला आहे. हा अनुवाद वाचताना श्रीज्ञानदेवांना अभिप्रेत असलेल्या व संतांना अभिमत असलेल्या मौनाचे स्वरूप काय, अंतरींची जपमाळ जपत असतानाही त्या व्यक्तीचे ते मौन कसे (टिकते) आणि 'धरोनि श्रीहरी जपे सदा' म्हणजे 'मोक्षरेखें आलेले', 'भाग्यें विनटलेले' व 'मागिलिया जन्मां मुक्त झालेले' स्वत: श्रीज्ञानदेवच जप करीत आहेत की त्यांच्याही अंतरीं असलेला श्रीहरीच जप करीत आहे, याची निश्चिती होत नाही. म्हणूनच शब्दांची सुरेख मांडणी असणारे अशा प्रकारचे अनुवाद वा भावानुवाद हे अध्यात्माची वर्मे स्पष्ट होण्यासाठी पुरेसे ठरत नाहीत, असे मला वाटते. असो.

श्रीज्ञानदेवकृत संपूर्ण हरिपाठ, त्याच्या सव्विसाव्या अभंगातील सुरुवातीला उद्धृत केलेले चरण व अध्यात्माची म्हणजे आत्मरूप ईश्वराबाबतची वर्मे स्पष्ट वा सूचित करणारी ज्ञानेश्वरी वाचतानाही संत श्रीज्ञानदेव हे, खरे तर, 'आत्मनिवेदन'च करीत आहेत म्हणजे स्वत:च्या स्थितीबाबतही अपत्यक्षपणे बोलत आहेत, असे जाणवत राहते. म्हणूनच स्वत: मुक्त असलेल्या ज्या अनुभवांत श्रीज्ञानदेव स्थित होते तो मुक्त व्यक्तीचा अनुभवच त्यांच्याप्रमाणे स्वत: मुक्त असलेल्या संत श्रीएकनाथ महाराजांनी आपल्या भागवतांत जणू आपल्या मार्गदर्शनासाठीच सविस्तर विशद करून ठेवला आहे. मुक्त व्यक्ती सदैव मौनातच असते, देवाविषयी निरुपण करताना किंवा व्यवहारातलेही बोलत असताना तिचे मौन कधीही मोडत नसते म्हणजे नेमके काय ते म्हणजेच पर्यायाने 'श्रीज्ञानदेवांच्या मौनाचा परम अर्थ' संत श्रीएकनाथकृत भागवताच्या अकराव्या अध्यायातील पुढील ओव्या वाचताना काही अंशी आपल्याला स्पष्ट होतो :-

(टीप : पुढे काही संबंधित वा ठळक ओव्यांचा इंटरनेटवर जो अर्थ उपलब्ध आहे त्यांत त्या ओव्यांचा परम अर्थ समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल अशी भर घातली आहे. तरीदेखील मूळ

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

संतसाहित्य वाचणे व निष्कामभावाने सोऽहंसाधना करीतच ते समजून घेणे हे सन्मार्गदर्शक व उत्तरोत्तर फलद्रूप होत असल्याचे व चालल्याचे जाणवत राहते, असे वारंवार जाणवले आहे.)

भगवान श्रीकृष्ण सद्भक्त श्रीउद्धव यांस (संत श्रीज्ञानदेवांसारख्या) त्या मुक्त झालेल्या महात्म्याबाबत सांगतात,

**सुरस कथा सांगे वाडेंकोडें ।**
**अथवा लौकिक बोलणे घडे ।**
**परि त्याची समाधिमुद्रा न खंडे ।**
**मौन न मोडे बोलतां ।।३३०।।**
**बोलताही न मोडे मौन ।**
**हेचि अनुभवाची आंतली खूण ।**
**शब्दामाजी नि:शब्दगुण ।**
**सज्ञान जाण जाणती ।।३३१।। ---**
**नि:शब्दीं उठती शब्द ।**
**शब्दामाजी ते नि:शब्द ।**
**यापरी करितांही अनुवाद ।**
**बोलोनि शुद्ध अबोलना ।।३३५।।**
**जळामाजी उपजे तरंग ।**
**जळ तरंगाचे निजांग ।**
**तेवीं नि:शब्दीं शब्द सांङ्ग ।**
**शब्दाचे सर्वांग नि:शब्द ।।३३६।।**
**वाच्य-वाचा-वाचकता त्रिपुटी ।**
**लोपूनि सांगे गोड गोठी ।**
**करितां सैराट चावटी ।**
**न सुटे मिठी मौनाची ।।३३७।। ---**
**सत्य मिथ्या जी बोलणी ।**
**नि:शेष प्राशूनि नेली दोनी ।**
**मूळींच्या मौनें जाहला मौनी ।**
**नाना वचनीं बोलतां ।।३३९।।**
**जरी तो माझे स्तवन करी ।**
**तरी मी त्याच्या स्तवनामाझारीं ।**
**तो जरी सैरा बडबड करी ।**
**त्याही माझारीं मी त्यासी ।।३४१।। ---**

**त्याचे मुखींचे जे जे बोल ।**
**ते मीचि बोलता सकळ ।**
**मुक्ताचे बोलणे केवळ ।**
**तुजप्रती विवळ म्यां केले ।।३४९।।**

**वरील ओव्यांचा भावार्थ :**

तो (मुक्त माणूस) मोठ्या प्रेमाने एखादी पारमार्थिक म्हणजे परमेश्वर वा संतांबाबतची एखादी सुरस कथा सांगू लागला अथवा लौकिकही म्हणजे व्यवहारातलीही एखादी गोष्ट सांगत असला तरी त्याच्या समाधिमुद्रेमध्ये अंतर पडत नाही; तो बोलत असतांनाही त्याचे मौन मोडत नाही (३३०). वैखरी वाणीनेही बोलताना मौन न मोडणे हीच अनुभवांतील अंतस्थ खूण आहे. शब्दामधील नि:शब्दगुण (बोलणेरूपी कर्म घडूनही मूळ आत्मस्वरूपांत कोणताही बदल घडून येत नसतो/नाही म्हणजे द्वैतभावजन्य कर्म घडून येत नसते/नाही) हे तो जाणता म्हणजे आत्मतत्त्वज्ञानी माणूसच जाणत असतो (३३१). ---- नि:शब्दांतून म्हणजे ॐकारोद्भव सृष्टीनिर्मितीपूर्वीच्या मूळ ब्रह्मस्वरूपातून, वैखरी, मध्यमा, पश्यन्ति व परा या चारी वाणींच्या पलीकडे असलेल्या परमात्मस्वरूपातून, अनुक्रमे परा-पश्यन्ति-मध्यमा-वैखरी या मार्गाने शब्द निघत असतात; त्या शब्दांमध्येही नि:शब्दस्वरूपच म्हणजे परब्रह्मस्वरूपच असते. अशाप्रकारे त्या मुक्त व्यक्तीचे बोलणे होत असल्यामुळे तो बोलत असूनही खरोखर मौनी असतो म्हणजे तत्त्वत: काही बोलत नसतो (३३५). पाण्यामध्ये लाटा उत्पन्न झाल्या तरी पाणी हेच ज्याप्रमाणे त्या लाटांचे मूळ अंग म्हणजे स्वरूप असते त्याप्रमाणे सारे शब्द, यापूर्वीच्या ओवीत म्हटल्याप्रमाणे, नि:शब्दातूनच येत असल्यामुळे शब्दाचे सर्वांग म्हणजे शब्दाच्या आत व बाहेरही नि:शब्दच म्हणजे ब्रह्मस्वरूपच असते (३३६). वाच्य म्हणजे जे बोलले जात असते वा जावयाचे असते ते, वाचा म्हणजे जे बोल वा शब्द उमटतात ते आणि वाचकता म्हणजे बोलणाऱ्या व्यक्तीचा मी बोलतो आहे हा भाव, ही त्रिपुटी, मूळ ब्रह्मस्वरूपाचे सानुभव भान असलेल्या त्या बोलणाऱ्या व्यक्तिच्या दृष्टीने लोप पावलेल्या त्याच्या त्या अवस्थेतही सैराट बोलणे, म्हणजे कोणताही हेतू मनांत नसलेल्या अशा त्याच्याकडून बोलणे, घडत असले तरी त्याची मौनाची मिठी सुटत नाही म्हणजे बोलूनही न बोलल्यासारखीच त्याची मौनस्थिती (मूळ ब्रह्मस्थिती) कायम रहात असते (३३७)...... (पुढील ओवींत मौनाचा हा अर्थ असल्याचे उल्लेखिले आहे.) त्या मौनी व्यक्तीने आत्मज्ञान नसलेल्या लोकांच्या दृष्टीने सत्य वाटणारी व्यावहारिक बोलणी व आत्मज्ञान झालेल्या ज्ञानी महात्म्यांच्या दृष्टीने मिथ्या मायाजनित ठरणारी बोलणी ही दोन्ही नि:शेषपणें पिऊन टाकलेली असतात; बोलत असताना व बोलत नसतानाही मायातीत अशा आपल्या मूळ स्वस्वरूपांत ती दोन्ही अजिबात उरत नसतात, मुळांत मौनच असते म्हणजे मूळ स्वरूपांत त्याहून भिन्न असे काहीही घडून येत नसते, असे अनुभवलेले असते. या अर्थाने तो सदैव स्वस्वरूपनिष्ठ म्हणजे अध्यात्मशास्त्रदृष्ट्या खरा मौनी असतो (३३९). भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, तो जरी माझे स्तवन करू लागला तरी त्याच्या त्या स्तवनामध्येही मी असतो; किंवा तो अवाच्यासवा बडबड करूं लागला तरी त्या

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

बडबडीमध्येही त्याला मीच असतो म्हणजे त्याच्या व त्याच्यासारख्या जातिवंतांना (आत्मतत्त्वज्ञानी भक्तांना) मीच दिसत असतो (३४१). ज्ञानेश्वरीच्या १८व्या अध्यायांत भगवान श्रीकृष्णाने अर्जुनास मी कसा आहे ते माझ्याशी एकरूप होऊन माझ्या भक्ताने जाणलेले असते त्यामुळे त्याच्या त्या जाणीवेला जाणणाराही मीच आहे, असे तो मज आत्म्याला अद्वय भक्तीने जाणून घेतलेला महात्मा, जाणीव-नेणीवेच्या पलीकडील अवस्था भोगणारा महात्मा, जाणत असतो - पहा ओवी क्र.१२०० व १२१४). --- भगवान श्रीकृष्ण सद्‌भक्त श्रीउद्धवास सांगतात की, त्या आत्मज्ञानी महात्म्याच्या तोंडातून जे जे शब्द निघत असतात ते सारे, खरे तर, मीच बोलत असतो; अशाप्रकारे हे मुक्त व्यक्तिच्या बोलण्याचे स्वरूप मी तुला विशद करून सांगितले (३४९).

संत श्रीज्ञानदेवांच्या मौनाचे पारमार्थिक स्वरूप स्पष्ट करणारी विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, संत श्रीएकनाथ यांनी पुढे भागवताच्या बाविसाव्या अध्यायांतील ३१व्या श्लोकाचा भावार्थ म्हणून ओवी क्र. ३५३ ते ३७२ मधून केलेले निरुपण, हे होय. परमात्मा म्हणजे देव हा कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांच्या सर्व कर्मांहून कसा सदैव अलिप्त असतो, ते या निरुपणांत आपल्याला स्पष्ट होते. उदा. त्वगिंद्रियाहून, घ्राणेंद्रियाहून व श्रवणेंद्रियाहून तो चित्स्वरूप असल्याने अविकारी असतो, रसनेंद्रियाहून तो आत्मा स्वानंदपूर्ण असल्याने रसातीत असतो, चक्षुरिंद्रिय, त्याचा दृश्य हा विषय व पाहण्याची क्रिया या सर्वांचाही प्रकाशक असलेला असा तो आत्मा चक्षुरिंद्रियाहून अतीत वा अलिप्त असतो, अशा आशयाच्या या सविस्तर निरुपणांतील ३६४व्या ओवीत वागिंद्रिय, तेथील अग्नि हे अधिदैवत व तिथे निवास असलेली सरस्वतीदेवी या सर्वांहून देवाधिदेव परमात्मा 'महामौनें' अलिप्त असतो, असे म्हटले आहे. देवस्वरूपाशी एकरूप झालेले श्रीज्ञानदेवही त्या 'महामौनावस्थेतच' होते, असे स्पष्ट करणारी ती ओवी अशी आहे -

**'वागिंद्रियीं वाच्य विषयो । अग्नि अधिदैवत तेथील पहा हो ।**
**सरस्वतीशक्तीचा तेथे निर्वाहो । यासि अलिप्त देवो महामौनें ।।''**

थोडक्यात, या शेवटच्या ओवीतून संत श्रीएकनाथ यांनी संत श्रीज्ञानदेव यांच्यासारख्या महात्म्यांच्या मौनाचे स्वरूप स्पष्ट करून ठेवले आहे. श्रीज्ञानदेव मूळ मौनावस्थेचे भोक्ते होते, आपण मुळात देवस्वरूप आहोत, देहधारी असलेल्या अशा आपल्या सर्वांच्याच अंतरीं बसून तो देवच अजपाजपरूपी स्वयंनिर्मित व स्वसंचालित माळ जपत असतो म्हणजे अध्यात्मशास्त्रदृष्ट्या ज्ञानदेवरूपी मला मौन्यावस्था लाभली आहे म्हणून मी कोणत्याही वाणीने काहीही बोलत नसतो, देवच सर्व काही बोलत वा करीत असतो / आहे, हा परम सत्ययुक्त म्हणजे सत्य व असत्य या दोन्हींच्या पलीकडील अर्थ संत श्रीज्ञानदेव यांनी **'ज्ञानदेवां मौन्य जपमाळ अंतरीं । धरोनि श्रीहरी जपे सदा ।।'**, या आपल्या 'हरिपाठातील' अभंगचरणातून उद्‌घोषिला आहे.

**-डॉ. विजय बाणकर,**
मु. पो. खडकवासला (आर. एस.),
पुणे -४११०२४

***



## माऊलींचा अमृतानुभव (भाग १)

**महाभारत युद्धाच्या प्रसंगी भगवंतांनी अर्जुनाला केलेला उपदेश श्रीमद्‌भगवतगीतेच्या रुपाने प्रकट झाला आहे. गीता हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून, त्याचे अठरा अध्याय व सातशे श्लोक आहेत. हजारो वर्षांपासून गीतेचे अध्ययन, चिंतन केले जात आहे. लाखो जनांना गीतामातेने ज्ञानामृत पाजून त्यांचे जीवन समृध्द केले आहे. हेच गीताज्ञान मराठी भाषेतून सांगण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका अर्थात् ज्ञानेश्वरीची रचना केली आहे. हे गीताभाष्य ओवीबद्ध असून, ज्ञानेश्वरीत एकूण नऊ हजार बत्तीस ओव्या आहेत.**

**-नामदेव सदावर्ते**

**सं**पूर्ण ज्ञानेश्वरी मुखोद्गत असलेले अनेक भाविक वारकरी आहेत. पण मला संपूर्ण ज्ञानेश्वरी भावार्थासह समजली असे कुणीही म्हणून नये. ज्ञानेश्वरीवर प्रवचने करणारे शेकडो लोक आहेत. ज्ञानेश्वरीचे सतत वाचन, पारायण करणारे लाखो मराठी भाविक आहेत. ज्ञानेश्वरीचे मनन, चिंतनही हजारो लोक करतात. तरीही ज्ञानेश्वरी गूढार्थासह संपूर्ण समजली असा गर्व कोणी करू नये.

**एथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेपण मिरवी तोचि उणें ।**
**आम्ही जाहलो ऐसे जो म्हणें । तो काहिंची नोहें ।। ज्ञा. ९/३६९**

संत नामदेव महाराज म्हणतात त्याप्रमाणे, **नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।।** हा ज्ञानेश्वरीच्या ओवीचा अनुभव घेण्यासाठी तिचे अनेकवेळा पारायणे करावयास हवी. त्यातून चिंतन घडावे. श्रद्धापूर्वक पदपाठचिकित्सा करावी. त्यामुळे मननचिंतन घडेल व माऊलींची कृपा असेल तर श्रीज्ञानेश्वरीच्या ओव्यांचा अनुभव प्राप्त होतो. नंतर भाविकांच्या आचरणातून तो प्रकट होतो.

अनेक भाविकांच्या बोलण्यात ज्ञानेश्वरीच्या ओव्या असतात. त्याचा अर्थही त्यांना माहीत असतो. पण त्याचाच गर्व असल्याने त्यांना अनुभव प्राप्ती घडत नाही. ज्ञानराज म्हणतात-

**तैसा चित्ती अहंते ठावो । आणि जिभे सकळ शास्त्रांचा सरावो ।**
**ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परी न पविजे माते ।।१५/३९६**

गीतेवरील ओवीबद्ध भाष्य असलेलया ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर श्रीसद्‌गुरू निवृत्तीनाथांच्या आज्ञेनुसार संत ज्ञानदेवांनी अनुभवामृत नावाचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला. हा ग्रंथसुद्धा ओवीबध्द असून, त्यात दहा प्रकरणे आहेत. एकूण ओव्या ८०६ असून, फक्त सद्‌गुरूंच्या मार्गदर्शनानेच ओव्यांचा अर्थ समजू शकतो.

उपमा, भाषासौंदर्य, तत्त्वज्ञान, साक्षात्कार, भक्ती व अद्वैत तत्व यांची सागंड, ज्ञानराजांची अलौकिक निरीक्षणशक्ती, कवित्व शैली, अलोट वाङ्‌माधुर्य या सर्व गुणांमुळे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अद्वितीय आहे. ज्ञानराज म्हणतात, माझे गुरू श्रीनिवृत्तीनाथ यांनी श्रीगीतागंगेच्या काठावरचे संस्कृत

भाषेचे दाट अरण्य तोडून, कोणालाही या गंगेत स्नान करता येईल, असा ज्ञानेश्वरीरुपी घाट बांधला. आता कोणीही या गीतागंगेत स्नान करून प्रयागमाधवाचे खुशाल दर्शन घेऊन संसारसागरातून मुक्त व्हावे.

**तीरे संस्कृताचित गहनें । तोडोनि मऱ्हाटीया शब्दसोपाने ।**
**रचिली धर्मनिधानें। श्रीनिवृत्तीदेवें ।।११-९**

अनुभवामृत या स्वतंत्र ग्रंथाच्या प्रारंभी पाच संस्कृत भाषेतील श्लोक असून, संत ज्ञानदेवांनी आपल्या सर्व रचना मराठी भाषेत केल्या, पण हे पाच श्लोक मात्र संस्कृत भाषेत आहेत. ज्ञानराजांची ही एकमेव संस्कृत रचना आहे. पहिल्या श्लोकात ज्ञानदेवांनी सद्‌गुरूंचे अलौकिकत्व सांगून गुरूवंदन केले आहे.

**यदक्षरमनाख्येयंमानंदमजकेवलम्।**
**श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं द्‌वैतमाश्रये ।।**

अक्षर म्हणजे क्षर न पावणारे, अर्थात् निर्विकार स्वरुप. अनाख्येय म्हणजे कोणत्याही तऱ्हेने सांगता न येण्याजोगे, आनंदस्वरुप. अज म्हणजे जन्मविरहीत अर्थात् स्वयंसिद्ध आणि नित्य. केव म्हणजे निरुपाधिक, साक्षेपसंबंध शून्य. श्रीमद् म्हणजे शोभावंत किंवा ऐश्वर्यवंत. आणि निवृत्ती या नावाने सुप्रसिध्द असे जे कोणी इष्टदैवत आहे, त्यांना मी निरंतर अनन्य भक्तीावाने शरण आहे. त्यांचाच मी आश्रय करून आहे.

सद्‌गुरू अविनाशी आहेत. ते निराकार असून, त्यांचे स्वरुप शब्दांनी सांगता येणारे नाही. ते आनंदस्वरुप आहेत. ते अजन्मा आहेत अर्थात् त्यांना मरणही नाही. ते उपाधिरहित आहेत. ते षड्‌गुणसंपन्न आहे. अशा सद्‌गुरू निवृत्तीनाथांचे ज्ञानदेव हे शिष्य आहेत. ज्ञाननाथ हे निवृत्तीनाथांचे आश्रित आहे. आत्मज्ञान देणारे सद्‌गुरू हेच इष्टदैवत असते.

**गुरूरित्याख्ययालोके साक्षाद्विधा हि शांकरी ।**
**जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्यैनिरंतरम् ।।**

जगतामध्ये गुरू या नावाने प्रसिध्द अखंड स्फुरणस्वरुप, त्याचप्रमाणे जी साक्षात्, सहज असणारी जी शांकरी विद्या, ब्रह्मविद्या अथवा अध्यात्मविद्या तिचा जयजयकार असो. अशा त्या गुरूस्थानी असलेल्या आणि दयेने आर्द्र झाल्याने पाझरत असलेलया ब्रह्मविद्येप्रत सवदा अनन्यभावाने माझा नमस्कार असो. विद्येवाचून गुरूला गुरूत्व नाही. जी विद्यारुपवस्तू तीच गुरूमूर्ती किंवा गुरूसंज्ञित वस्तू तीच मूर्तिमंत विद्या. असे या श्लोकांत गुरू आणि विद्या या उभयतांत तत्वतः ऐक्य दर्शवले आहे. आश्रयाश्रयी भाव नाही. यावरुन आत्मा म्हणजे ज्ञानाचा आश्रय आणि ज्ञान त्याचा आश्रित गुण अशा समजुतीचा सर्व वादांचे येथे निरास सुचविला आहे. तात्पर्य, ज्ञान जे आहे, तीच आत्मवस्तू हा सिध्दांत आहे.

ज्ञान आणि आत्मरुप यांच्या एकरुपतेप्रमाणेच शिव-शक्ती, प्रकृती-पुरुषाचे अभेदत्व व्यक्त करणाऱ्या श्लोकात ज्ञानदेव म्हणतात-



**सार्धंकेनच कस्यार्धं शिवयोः समरुपिणोः ।**

**ज्ञानतुंनशक्तेलग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ।।**

समरुप अशा शिवशिवासंज्ञित प्रकृतीपुरुषांपैकी कोणाचा अर्धा भाग कोणाशी संलग्न झाला आहे, हे सर्वथा जाणता येणे शक्य नाही. कारण त्या दोघांमध्ये द्वैताचा केवळ आभास आहे. तेव्हा कितीही विचार करून पाहिले तरी त्या दोहोंमधील संधीचे ज्ञान होणे अत्यंत अशक्य आहे. प्रकृती आणि पुरष अर्थात् जड आणि चेतन असे अंश किंवा भाव परस्परमिश्रित अशा दोन रुपांनी भासतात. वस्तुतः त्यांच्यात द्वैतरुप नाही. कारण सत्तास्फूर्ती तर त्या दोघांमधील भासमानात समरस आहे. म्हणजे ज्यांचे लक्षण एकच असते, ते पदार्थ दोन म्हणून भासले तरी संख्येने ते दोन होत नाहीत.

**अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयंतौ मिथस्तराम् ।**

**तौ वंदे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ।।**

आपणामध्ये परस्पर अद्वैतरुप आहे, हे दर्शित करणाऱ्या अशा त्या मूलप्रकृती व पुरुष नावाच्या अनंत जगताच्या माता-पितरास त्यांच्या तात्विक स्वरुपाचे ज्ञान व्हावे म्हणून ज्ञानदेव अद्वैतरुपी प्रकृतीपुरुषाचे, क्षर-अक्षर, क्षेत्र-क्षेत्रज्ञ, माया-ब्रह्म, जड चेतनाचे ज्ञान होणे यासच अध्यात्मज्ञान म्हणतात. ज्ञानदेव संपूर्ण अनुभव अमृतानुभवातून प्रकट करतात. याच ज्ञानाची सविस्तर चर्चा या ग्रंथातील दशनप्रकरणात ज्ञानराज करतात.

**मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ।**

**क्षीणाग्रमूल मध्याय नमः पूणाय शंभवे ।।**

जो सर्व सृष्टीचा आदि, मध्य आणि अंत असा असून, जो या उत्पत्ती-स्थिती-लयाची अधिष्ठित्री देवतामूर्ती म्हणजेच ब्रह्मा, विष्णू, महेश अशा स्वरुपाचाही आहे. तथापि, त्याला आदि, मध्य व अंत नाही. म्हणजे उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय या जगदावस्था ज्यास नाहीत, अशा त्या परिपूर्ण आणि सुखजनक परमात्म्यास माझा अनन्यभावाने नमस्कार असो.

ज्ञानेदवांनी अमृतानुभवाच्या प्रारंभी पाच संस्कृत श्लोकांची रचना केली. ते मंगलाचरणाचे श्लोक आहेत. पण त्यात सूत्रबध्द मांडणी असल्याने ते श्लोक गूढ वाटतात. पुढे अमृतानुभवाची दशप्रकरणात्मक रचना ओवीबध्द असून, अत्यंत प्रासादिक रचना आहे. प्रत्येक ओवी पुन्हा पुन्हा वाचून अर्थ जाणून चिंतन करण्यास योग्य आहे. प्रत्येक ओवीचा अर्थ गहन, गंभीर असला तरी अवघड नाही. प्रथम प्रकरणात ६४ ओव्या असून, प्रकरणाचे नाव शिवशक्तीसमावेशन असे आहे. शिव-शक्तीची एकरुपता प्रकट करणाऱ्या प्रत्येक ओवीत आनंददायी ज्ञान आहे.

**ऐशी ही निरूपाधिकें । जगाची जिथें जनकें ।**

**तिथे वंदिली मियां मूळिकें । देवो देवी ।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

वरील पाच संस्कृत श्लोकात सांगितलेले उपाधिरहित नसलेले म्हणजे ज्याला जन्म नाही, मृत्यू नाही, रुप नाही, वर्ण नाही, कर्म नाही, स्थळकाळ नाही, अशा स्वयंभू, स्वयंसिध्द चिदानंदस्वरुप परमात्मतत्वास मी वंदन केले, असे ज्ञानदेव म्हणतात.

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहिताना भगवद्‌गीतेतील विचार अनेक दृष्टांतपूर्वक व्यक्त केले आहे. ज्ञानराजांना आपले अध्यात्मातील स्वानुभाविक स्वतंत्र विचार ज्ञानेश्वरीत व्यक्त करता आले नाही. म्हणून सद्‌गुरू निवृत्तीनाथांनी हा ग्रंथ लिहिण्याची आज्ञा केली. अमृतानुभव या ग्रंथातील विचार समजण्यासाठी पात्रता पाहिजे. ज्याचे हृदय वैराग्यशून्य असल्यामुळे जो बहिर्मुख व विषयासक्त आहे. शास्त्राने निषिध्द ठरविलेले अभक्षमांसादि व अपेयमद्यादि व परद्रव्यापहार असे कर्म करणारे या ग्रंथाचे ज्ञान प्राप्त करू शकत नाही.

भगवंतावर प्रेम करणारा, हृदयी अखंड नामजप करणारा श्रध्दावान भक्तच अमृतानुभव प्राप्त करू शकतो. ज्यांना आत्मज्ञानसंपन्न व्हायचे आहे. त्यांनी विवेक, वैराग्य, ज्ञानाचा आश्रय करून सद्‌गुरूसन्निध्यात ग्रंथवाचन, चिंतन करावे. अमृतानुभव ग्रंथातील संस्कृत श्लोकात ज्ञानदेवांनी देवोदेवी प्रकृतीपुरुष उपाधिरहित आहेत, असे म्हटले आहे. तसेच तीच दोघे जगतनिर्माण करणारी आहेत. अशा या प्रकृतीपुरुषांना जगाची मातापितरे म्हणून नमन केले आहे. सर्व जग प्रकृतीपुरुषात्मक वस्तूरूप आहे. तरीही ती निरुपाधिक आहे. प्रकृतीपुरुष दोन भासत असले तरी ते एकरुप आहेत. अशा या दोघांपासून जगत उत्पन्न झाले असले तरी ते दोघे एकरुप असूनही भिन्न व अलिप्त आहेत. त्यांनी सर्वांना उत्पन्न केले पण ते मायबाप निराकार, अमूर्त असल्याने समजत नाही. अशा परमात्मतत्वाचे स्वरुप कळून आत्मज्ञान मिळण्यासाठी अमृतानुभव प्राप्त व्हावा. ज्ञानराजांनी त्यांच्या अमृतानुभावाचे प्रकटीकरण केले आहे. तो अमृतानुभव आपणास प्राप्त व्हावा म्हणून सद्‌गुरूकृपा हवी. त्यासाठी सद्‌गुरूस्मरण करून त्यांना वंदन करूया.

**- नामदेव सदावर्ते,**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



कळस

सातवाहन राजांच्या काळात मंदिरनिर्मितीची परंपरा अधिक दृढ झाली. गावोगावी मंदिरे बांधली जाऊ लागली. देवाला गावातील सर्वोच्च स्थान देण्याच्या भावनेतून मंदिरे उंच बांधली गेली आणि त्यावर शिखरे उभारली गेली. काळाच्या ओघात शिखर आणि कळस यांना वास्तुशास्त्रीय व आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले. मंदिरातील ओंकाराचा नाद शिखरयुक्त रचनेत घुमतो आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरी मानवी मनावर परिणाम करतात, अशी धारणा आहे. या लहरींमुळे मन एकाग्र होते, विषयवासना क्षीण होतात आणि माणूस काही काळ संसाराच्या चिंतांपासून दूर जातो. अशा अवस्थेत तो ध्यानस्थ होऊ लागतो.

**- बंडोपंत दि. कुलकर्णी**

**आ**स्तिक म्हणजे केवळ देवाला मानणारा मनुष्य नव्हे, तर देवत्वाच्या अनुभूतीचा सातत्याने शोध घेणारा साधक होय. असा मनुष्य मंदिरात गेल्याशिवाय राहू शकत नाही, कारण मंदिर हे त्याचे श्रद्धास्थान असते. जिथे मनाला शांतता लाभते, अंतःकरण प्रसन्न होते आणि आत्म्याला दैवी स्पर्श जाणवतो, तेच स्थान श्रद्धेचे केंद्र बनते. परंतु श्रद्धा म्हणजे एखाद्या विशिष्ट स्थानी भाव ठेवून ते जसे आहे तसेच स्वीकारणे नव्हे. श्रद्धा ही आंधळेपणाने स्वीकारण्याची वृत्ती नसून, ती जाणून घेण्याची, समजून घेण्याची आणि आत्मसात करण्याची प्रक्रिया आहे. एखाद्या तत्त्वावर, संकल्पनेवर किंवा दैवी शक्तीवर भाव ठेवून त्याचे श्रवण करणे, त्याबद्दल जिज्ञासा निर्माण होणे, त्याचा अनुभव घेणे आणि त्यातून नवे ज्ञान प्राप्त करण्याचा सातत्याने प्रयत्न करणे, यालाच खरी श्रद्धा म्हणतात.

आजच्या काळात काही तरुण आणि नास्तिक वृत्तीचे लोक उपरोधिकपणे प्रश्न विचारतात की, परमेश्वर जर संपूर्ण चराचरात व्यापलेला असेल, तर मंदिरात जाण्याची गरज काय? हा प्रश्न वरकरणी तर्कसंगत वाटला तरी त्यामागे अध्यात्माचा सूक्ष्म अर्थ समजून घेण्याची वृत्ती कमी दिसून येते. जर घरात अन्न उपलब्ध असते, तर माणूस 'आऊटिंग'च्या नावाखाली हॉटेलमध्ये जेवायला का जातो? याचा विचार करावा लागेल. कारण माणसाच्या मनाला वातावरणाची आवश्यकता असते. संसारातील आनंद, उत्सव आणि विरंगुळा यासाठी जसे विशिष्ट वातावरण हवे असते, तसेच आध्यात्मिक उन्नतीसाठी आणि अंतर्मन शुद्ध करण्यासाठीही सात्त्विक वातावरणाची गरज असते.

मंदिर हे केवळ दगड-मातीचे बांधकाम नसते. ते आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करणारे केंद्र असते. मंदिरात प्रवेश करताच मनातील चंचलता कमी होऊ लागते. घंटानाद, मंत्रोच्चार, धुपाचा सुगंध, दीपज्योतीचे तेज आणि भक्तिभावाने भरलेले वातावरण मनाला स्थैर्य देते. त्यामुळे मंदिर हे आत्मशोधाचे, अंतर्मुखतेचे आणि श्रद्धेचे एक श्रेष्ठ माध्यम ठरते. मंदिरात जाऊन माणूस काही काळ संसारातील ताणतणाव विसरतो आणि आपल्या अंतरंगाशी संवाद साधू लागतो. म्हणूनच मंदिराची आवश्यकता आजही तितकीच महत्त्वाची आहे. मंदिर अन्य काही नसून ब्रह्मांडिय ऊर्जेच्या अनुभवातून मनाला धीर देणारे स्थान होय.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

मंदिरात जात असताना प्रथम नजरेत भरते ते त्याचे शिखर. दूरवरून दिसणारे मंदिराचे उंच शिखर मनात कुतुहल निर्माण करते. मंदिराला शिखर का बांधले जाते? त्यामागे काही विशिष्ट कारण आहे का? असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. परंतु, याबाबत सर्वसामान्य पातळीवर सविस्तर माहिती फारशी उपलब्ध होत नाही. शेवटी विचार वास्तुशास्त्राकडे वळतो. तथापि, वैयक्तिक अभ्यासातून असे जाणवते की मंदिराच्या शिखराचे मूळ कारण केवळ वास्तुशास्त्रीय नसावे. त्यामागे सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि ऐतिहासिक संदर्भ अधिक महत्त्वाचे दिसून येतात.

प्राचीन काळात स्वतंत्र मंदिरांची संकल्पना अस्तित्वात नव्हती. त्या काळातील ऋषी, मुनी आणि साधक परमेश्वराला नित्य स्मरणात ठेवून कर्मप्रधान जीवन जगत असत. ईश्वर हा बाह्य स्वरूपात नसून अंतःकरणात वसतो, अशी भावना अधिक प्रबळ होती. म्हणूनच त्या काळात उपासनेसाठी मोठमोठ्या मंदिरांची आवश्यकता भासली नाही. शिवाय देवांचे वास्तव्य पृथ्वीवरील सर्वोच्च स्थानी असल्याची धारणा प्राचीन समाजात होती. त्यामुळे अनेक प्राचीन मंदिरे डोंगर-दऱ्यांमध्ये किंवा उंच टेकड्यांवर आढळतात. डोंगराच्या सर्वोच्च बिंदूला 'शिखर' म्हटले जाते, तर त्यावरील निमुळता अंतिम भाग म्हणजे 'कळस'. मंदिराची वास्तू ते डोंगर रूपात असते. शिवाय आज ध्यान केंद्रे पिरॅमिड आकारात म्हणजे डोंगर रूपात बांधले जातात. कारण तशा वास्तूमध्ये ब्रह्मांडातील चैतन्य ऊर्जा आणि चुंबकीय ऊर्जा याचा संगम संतुलित राहते व मनाला संतुलित ठेवते.

इतिहासाच्या अभ्यासातून असे दिसून येते की सातवाहन राजांच्या काळात मंदिरनिर्मितीची परंपरा अधिक दृढ झाली. गावोगावी मंदिरे बांधली जाऊ लागली. देवाला गावातील सर्वोच्च स्थान देण्याच्या भावनेतून मंदिरे उंच बांधली गेली आणि त्यावर शिखरे उभारली गेली. काळाच्या ओघात शिखर आणि कळस यांना वास्तुशास्त्रीय व आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले. मंदिरातील ओंकाराचा नाद शिखरयुक्त रचनेत घुमतो आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरी मानवी मनावर परिणाम करतात, अशी धारणा आहे. या लहरींमुळे मन एकाग्र होते, विषयवासना क्षीण होतात आणि माणूस काही काळ संसाराच्या चिंतांपासून दूर जातो. अशा अवस्थेत तो ध्यानस्थ होऊ लागतो. हीच दैवी ऊर्जा अनुभवण्याची अवस्था मानली जाते. ही भावना डोंगर दरी व ऋषी महात्म्यांनी केलेल्या साधनेच्या स्थळावरून सुचलेली कल्पना आहे. त्यात बदल होत मनाला आकर्षित करणाऱ्या वास्तू उभ्या राहू लागल्या. शिखराचा वरचा निमुळता भाग अधिक आकर्षक आणि तेजस्वी दिसावा म्हणून त्यावर नक्षीदार कळस बसवला जाऊ लागला. मंदिर या संकल्पनेत केवळ सौंदर्य नव्हते, तर दैवी श्रेष्ठत्वाची प्रतीकात्मक मांडणी होती. गावातील सर्वसामान्य माणसाला दूरवरून मंदिराचे शिखर दिसावे आणि त्याच्या मनात भक्तिभाव जागृत व्हावा, हा त्यामागील उद्देश असावा. मंदिराचे शिखर बहुधा घुमटाकार किंवा डोम स्वरूपात बांधले जाते. त्यामागेही एक सूक्ष्म कल्पना आहे. जशी एखादी ऊर्जा विशिष्ट केंद्रात साठवली जाते, तशीच आध्यात्मिक ऊर्जा त्या रचनेत स्थिर व्हावी, अशी भावना त्यामागे दिसून येते. श्रीयंत्राची रचनाही अशाच ऊर्जाकेंद्राच्या तत्त्वावर आधारित असल्याचे मानले जाते. पुढे या संकल्पनांमधूनच पिरॅमिडच्या ऊर्जाशास्त्राची कल्पना विकसित झाली, असे काही अभ्यासक मानतात.

पूर्वीच्या काळात वापरले जाणारे तांब्याचे गडू किंवा कलश पालथे ठेवले असता ते मंदिराच्या शिखरासारखे दिसतात. संस्कृतमध्ये तांब्याच्या पात्राला 'कलश' म्हटले जाते. पुराणांमध्ये कलशस्य मुखे विष्णुः, कंठे रुद्रः समाश्रितः, मूले तस्य स्थितो ब्रह्मा असे वर्णन आढळते. म्हणजेच कलशाच्या मुखात विष्णू, कंठात रुद्र आणि तळाशी ब्रह्मा वास करतात, अशी भावना व्यक्त केली आहे. या

प्रतीकात्मक विचारातूनच मंदिराच्या कळसाची संकल्पना विकसित झाली असावी. श्रद्धा, अनुभव आणि अध्यात्म यांच्या संगमातून ही परंपरा अधिक दृढ होत गेली.

आज गावोगावी दिसणाऱ्या मंदिरांचा उल्लेख उपनिषदांमध्ये किंवा प्रारंभीच्या वैदिक साहित्यामध्ये फारसा आढळत नाही. कारण त्या काळात देहालाच मंदिर मानले गेले आहे. मानवी शरीर हेच परमात्म्याचे खरे निवासस्थान आहे, अशी भारतीय अध्यात्माची धारणा आहे. शरीरावरील शेंडी म्हणजेच त्या मंदिराचे शिखर मानले गेले. याचा गूढ अर्थ असा की, माणसाने बाह्य मंदिरात जाऊन शेवटी स्वतःच्या अंतर्मनात प्रवेश करावा. मंदिरातील गर्भगृहात जसा देव विराजमान असतो, तसाच परमात्मा प्रत्येकाच्या अंतःकरणात वसलेला आहे. म्हणून मंदिरात गेल्यावर केवळ बाह्य दर्शन न घेता, आपण आपल्या देहरूपी मंदिरात प्रवेश करून अंतर्मनातील परमात्म्याला शोधत आहोत, असा भाव मनात जागृत झाला पाहिजे. जेव्हा भक्त अशा भावनेने मंदिरात प्रवेश करतो, तेव्हा तो बाह्य जगापासून अंतर्मुखतेकडे प्रवास करू लागतो. मंदिराचे शिखर म्हणजे आत्मोन्नतीचे प्रतीक आहे आणि कळस म्हणजे त्या साधनेची अंतिम अवस्था. ज्या क्षणी माणूस आपल्या अंतरंगातील परमेश्वराशी एकरूप होतो, त्या क्षणी तो खऱ्या अर्थाने कळस गाठतो. हाच जीवनाचा सर्वोच्च आध्यात्मिक अनुभव आहे.

श्रद्धा म्हणजे केवळ देवापुढे डोके टेकविणे नव्हे, तर स्वतःच्या अंतःकरणातील दैवी शक्ती जागृत करण्याचा प्रयत्न होय. मंदिर ही त्या प्रवासाची प्रेरणा आहे. शिखर हे उन्नतीचे प्रतीक आहे आणि कळस हा आत्मसाक्षात्काराचा संदेश देणारा आहे. म्हणून मंदिरात जाणे म्हणजे केवळ परंपरा पाळणे नव्हे, तर स्वतःला शोधण्याचा, अंतर्मन शुद्ध करण्याचा आणि परमेश्वराशी एकरूप होण्याचा एक आध्यात्मिक प्रयत्न आहे. रामकृष्णहरी! सद्‌गुरु जंगलीदास माऊलींच्या चरणी समर्पित.

- **बंडोपंत दि. कुलकर्णी,** सोलापूर
(जिल्हा न्यायाधीश, पुणे)

***



## ऐसी कर्मगती : ऐसा ध्यानी ज्ञानिया- भाग ६

**ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान...**

ज्याच्या मनात रामकृष्ण जप नाही ते मन नव्हे आणि ज्याला विष्णूस्मरण होत नाही त्याला ज्ञान नाही. हरिपाठ न करणारा जन्माला आलेला करंटा ठरतो, त्याच्या मुखी रामकृष्ण जप कसा करता येईल? द्वैताला झाडायला गुरुकृपा लागते आणि द्वैत संपल्याशिवाय हरिकीर्तन घडत नाही. सगुण रुपाचे सतत ध्यान केले, तसेच नामपाठ केला तर त्या मौनात प्रपंच विरुन जातो.

-डॉ. सुनील शिंदे

**वि**ष्णू नामाचा जप नाही त्याचे ज्ञान व्यर्थ आहे आणि रामकृष्णाठायी मन नसेल तर आयुष्य निरर्थक, ही माउलींची स्पष्टोक्ती आहे. हरीपाठ न करण्याचा करंटेपणा अयोग्य. सगुण रुपाचे ध्यान तसेच नामपाठाचीही महती आहेच आहे. मौनातला नामजप, नामपाठदेखील तोलामोलाचा. सद्‌गुरुशिवाय तर ज्ञान नोहे. कीर्तनी नाम जरुर समजून उमजून घ्यावे. हरीपाठातील माउलींचा हा असा सदुपदेश आणि दाखवला.

**विष्णुविणें जप व्यर्थ त्याचे ज्ञान।**
**रामकृष्णीं मन नाहीं ज्याचे।।१।।**
**उपजोनी करंटा नेणें अद्वैत वाटा।**
**रामकृष्णीं पैठा कैसा होय।।२।।**
**द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान।**
**त्या कैंचे कीर्तन घडेल नामीं।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान।**
**नामपाठ मौन प्रपंचाचे।।४।।**

(आशय : ज्याच्या मनात रामकृष्ण जप नाही ते मन नव्हे आणि ज्याला विष्णूस्मरण होत नाही त्याला ज्ञान नाही. हरिपाठ न करणारा जन्माला आलेला करंटा ठरतो, त्याच्या मुखी रामकृष्ण जप कसा करता येईल? द्वैताला झाडायला गुरुकृपा लागते आणि द्वैत संपल्याशिवाय हरिकीर्तन घडत नाही. सगुण रुपाचे सतत ध्यान केले, तसेच नामपाठ केला तर त्या मौनात प्रपंच विरुन जातो.)

त्रिवेणी संगमाचे अथवा विविध तीर्थक्षेत्रींचे भ्रमण कितीही घडले, यातायात केली तरीही नामसाधनेवर चित्त नसेल तर काय उपयोग? नामासी कधीही पारखे नसावे. नाम न घेण्याचे पातक घडू नये. साक्षात महर्षि वाल्मिकींचा दृष्टांत आहे की, नाम सामर्थ्याने उद्धार होईल. माउलींचा खऱ्या अर्थाने नि:संदेह भरवसा आहे की, हरीनामामुळे, हरीजपाने कुळाची शुद्धी घडेल.

**त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थे भ्रमीं।**

**चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ।।१।।**

**नामासी विन्मुख तो नर पापिया।**

**हरीविण धांवया न पवे कोणी।।२।।**

**पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक।**

**नामें तिन्ही लोक उद्धरती।।३।।**

**ज्ञानदेव म्हणें नाम जपा हरिचें।**

**परंपरा त्याचे कुळ शुद्ध ।।४।।**

(आशय : तीन नद्यांचा संगम असलेले क्षेत्र तीर्थ असते, अशा तीर्थांचे भ्रमण केले की भगवंत जोडता येतो असे मानतात, तथापि हे करताना चित्तात नाम नसेल तर भ्रमण व्यर्थ ठरते. जो नामाला विन्मुख आहे तो पापी आहे आणि त्याला सोडवायला धावणारा फक्त ईश्वर असतो. पुराण प्रसिद्ध असलेले महर्षि वाल्मिक देखील सांगतात की, नामामुळे तिन्ही लोकांतून उद्धार करता येतो. जो नाम जपेल तोच नव्हे तर त्याच्यासकट त्याचे संपूर्ण कुळ पावन होते.)

हरिउच्चारण श्रेष्ठतम आहे. अपरिमित अशा पापाच्या राशीही हरीनाम उच्चाराने लयाला जातात असा माउलींचा सुस्पष्ट दाखला आहे. अग्नी जसे सुकलेले गवत नष्ट करेल, तसेच नाम साधनेमुळे पापाचा विनाश होतो. हरीनाम आहे अगाध. यामुळेच भूतबाधा नाम साधनेच्या भीतीने नाहिशी होते. श्रीहरी समर्थ असल्याने खुद्द उपनिषदांनादेखील सार्थ आकलन कठीण आहे, ही माउलींची भावना पुढील अभंगाधारे प्रकटते -

हरि उच्चारणीं अनंत पापराशी।

जातील लयासी क्षणमात्रें।।१।।

तृण अग्निमेळें समरस झाले।

तैसे नामे केले जपता हरी।।२।।

हरि उच्चारण मंत्र हा अगाध।

पळ भूतबाधा भेणे याचें।।३।।

ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ।

न करवे अर्थ उपनिषदांचे।।४।।

(आशय : हरिनामाचा उच्चार केला असता, जीवाच्या अनंत पापराशी भस्मसात होतात. जसे अग्नीशेजारी वाळलेले गवत पेटते, तसे नाम झाल्यावर पापाचे होते. हरिनाम हा अगाध मंजपत्र जपल्यावर पिश्चाचबाधा हटते. ज्याचे वर्णन करायला उपनिषदे देखील असमर्थ आहेत, तो माझा हरी समर्थ आहे.)

व्रतवैकल्ये, पूजाअर्चा तसेच तीर्थाटने या उपचारांमागे निर्मळ भक्तिभाव नसेल तर ते सारे वाया जाणारे, हा आहे माउलींचा इशारा. हरी लाभतो भावबळाने. तळहातावरील आवळा, तशी भक्ती आणि

पाऱ्याचे कण अथवा थेंब जमिनीवरून गोळा करणे मोठाच प्रयास, त्याप्रमाणे नामसाधन वगळता अन्य पर्यायाने भगवंत प्राप्त करण्यासारखा खटाटोप. निर्गुणी दर्शन घडवले ते सद्‌गुरू निवृत्तीदेवांनी, असे माउली सांगतात.

**तीर्थ व्रत नेम भावेवीण सिद्धी।**
**वायांची उपाधी करिसी जनां।।१।।**
**भावबळे आकळे येरवी नाकळे।**
**करतळीं आंवळे तैसा हरी।।२।।**
**पारियाचा रवा घेतां भूमीवरी।**
**यत्न परोपरी साधन तैसे।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण।**
**दिधलें संपूर्ण माझे हातीं।।४।।**

(आशय : तीर्थभ्रमण, व्रत, नियमित पूजा हे उपचार भक्तिभावाने केले नाही, तर वाया जातात. त्याने फक्त अनाठायी उपाधी मिळेल. श्रीहरी तर भावबळाने आकळतो. भाव नसल्याने तो कळत नसेल तर भक्तिभाव असेल तर तो तळहातावर घेतलेला आवळ्याएवढा जवळ असतो. पाऱ्याचे खाली पडलेले थेंब उचलायला प्रचंड प्रयत्न करावे लागतात, तसेच नामसाधन सोडता इतर साधनांनी त्याला प्राप्त करायला सायास पडतात. निवृत्तीनाथांनी मला अभेद निर्गुण रुपाचे दर्शन घडवले, असे माऊली स्पष्ट करतात.)

कर्मगतीसह ध्यानी ज्ञानियाची अशी आहे एकूणच स्थिती गती. माउली निर्गुणाचे मोल सांगतात. साधनांची रीत समजावतात. भक्तिचे रुप दर्शवितात. नाममहात्म्य कथन करतात. भक्ती आणि भगवंताचे अद्वैत समजावून देतात. पुराणांचा दाखलाही प्रसंगी देतात. गुरुज्ञानाची थोरवी कथन करतात.

**- डॉ. सुनील शिंदे,**
'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसेडेन्सी',
बी-विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड ,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/९०७५९९४३३२)

***

# दक्षिण भारत सत्संग यात्रा २००५ आणि २००९

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या वतीने प. पू. सद्गुरू आणि संत सहवासात स्पेशल रेल्वेने मोठ्या संख्येने यात्रेकरू भाविकांसह सत्संग तीर्थयात्रा मागील तीन दशकांत भारतातील विविध तीर्थक्षेत्री काढण्यात आल्या.

सप्टेंबर २००५ मध्ये हैदराबाद, विजयवाडा, व्यंकटगिरी, रेनिगुंटा, तिरुपती बालाजी आणि चेन्नई व मार्च २००९ मध्ये दक्षिण भारतातील विजयवाडा, श्रीशैल्यम, तिरुपती बालाजी, मदुराई, कन्याकुमारी, रामेश्वर, बेंगलोर, म्हैसूर आदी स्थलदर्शन तीर्थक्षेत्र सत्संग यात्रा झाल्या.

या सत्संग यात्रांचा उद्देश असा की, भाविक आपल्या नित्याच्या प्रपंचातून काही कालावधीसाठी अलग होऊन त्याने परमार्थासाठी वेळ द्यावा व संत सहवासात तीर्थक्षेत्री आत्मतत्वाच्या सुंदर, निरामय सृष्टी आविष्काराचे यथार्थ दर्शन मिळावे.

प. पू. सद्गुरू सान्निध्यात स्पेशल रेल्वेने कोपरगाव रेल्वे स्थानकावरून सप्टेंबर २००५ मध्ये हैदराबाद येथे आगमन झाले. हैदराबाद येथील प्रसिद्ध सालारगंज संग्रहालय पाहिले. त्यात अनेक शिल्पे, कलात्मक वस्तू, दुर्मीळ हस्तलिखिते, हस्तीदंतपासून बनविलेल्या वस्तू पहावयास मिळाल. चारमिनार पाहिला. बिर्ला मंदिरातील भव्य व्यंकटेश मूर्ती व गणेशमूर्ती पाहून मुक्कामाच्या ठिकाणी आलो. सत्संगात तेथील गायत्री चॅरिटेबल ट्रस्ट भाविकांची भजनसेवा झाली. तेथील बालकलाकारांनी गणेशवंदना, गुरुस्तवन, गायत्री मंत्र यावरील कथक नृत्ये, रामायनातील कथानकावरील नृत्य सादर केले. रात्रीचे प्रसाद भत्तेजन घेऊन सिकंदराबादहून रेल्वेने रात्रीचा प्रवास करीत दुसऱ्या दिवशी पहाटे विजयवाडा येथे आलो.

विजयवाडा हे भव्य नगर कृष्णा नदी तीरावर वसलेले आहे. या ठिकाणी कृष्णेचे विस्तीर्ण नदीपात्र आहे. पहाडावर कनकदुर्गा देवीचे भव्य सुवर्णमंदिर आहे. विजयवाडा येथे शिवमंदिरात प. पू. सद्गुरूंच्या उपस्थितीत महादेवाचा अभिषेक झाला. स्थानिक भाविकांच्या उपस्थितीत सत्संग झाला. विजयवाडा शहर पाहून सर्वजण रात्री रेल्वेने व्यंकटगिरीला पोहचलो. व्यंकटगिरी येथे प. पू. सद्गुरूंनी पूर्वी तपोवनातील त्यांच्या वास्तव्यात उपासना, ध्यानधारणा केली होती. तेथील साईमंदिरानजीक बाबांची कुटी पाहिली. या ठिकाणी सत्संग झाला. रात्रीच्या निवासानंतर सकाळी रेनिगुंटा येथे बसने आलो. तेथून तिरुपती बालाजी येथे आल्यावर सर्वांनी रांगेतून दर्शन घेतले. दर्शनाने चित्त प्रसन्न झाले. प्रसाद घेऊन रेनिगुंट्यास परतलो.

रात्री रेनिगुंट्यावरून रेल्वेने प्रवास करीत चेन्नई शहरात सकाळी पोहचलो. चेन्नई येथील मलापुरे विभागातील संस्कृत अध्यापक विद्यालय व त्यागराज कार्यालयात सर्वांची निवास व्यवस्था झाली. सकाळचा नाश्ता, चहापाणी झाल्यावर या ठिकाणी प. पू. सद्गुरूंच्या समवेत भव्य सत्संगात भजने, प्रवचने स्थानिक लोकांच्या सहभागात पार पडला. संतांनी प्रवचनातून सांगितले, परमात्मा सर्वत्र आहे. सर्वांच्या हृदयमंदिरी असलेल्या आत्म्याला जाणून घेण्याचा अंतःकरणपूर्वक प्रयास करावा. त्यासाठी सद्गुरूचरणी शरण जावे. प. पू. सद्गुरूंनी दिलेल्या नामाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ध्यानाच्या माध्यमातून आत्मचिंतन करता आत्मस्वरुपाची प्रचीती येते. सर्वत्र आत्माराम विविध रुपाने नटलेला दिसतो. श्री सद्गुरूंच्या भेटीने अज्ञान दूर होते. अंतःकरणात ज्ञानाचा प्रकाश पडतो. संसारभय निघून जाते व जीवनात शाश्वत सुखाचा लाभ होतो.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

मार्च २००९ मध्ये पार पडलेल्या दक्षिण भारत स्पेशल रेल्वेने प्रवासाने विजयवाडा येथे येऊन पुढे आराम बसने २२० किमी प्रवास करीत श्रीशैल्यम, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग स्थाळी आलो. स्नानादि झाल्यावर सर्वांनी श्रीशैल्यम मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. या परिसरातील साक्षी गणपती, श्री आद्य शंकराचार्य यांची तपोभूमी, शिखरेश्वर दर्शन केले. रोपवेमधून जाऊन तेथील पाताळगंगा जलाशय येथे दर्शन केले. रात्री प्रसाद भोजनानंतर सत्संग झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी श्री शैल्यमवरून सात तासांचा प्रवास करीत बालाजी दर्शनासाठी रेनिगुंटा येथील स्थानिक बसने तिरुमला डोंगररस्ता २४ किमी प्रवास करून तिरुपती बालाजी येथे दर्शन घेतले. २००५ नंतर हे तिरुपती बालाजी येथे दुसऱ्यांदा भेट होती. प्रसाद घेतला. तेथील आकाशगंगा, पापविनाशी तीर्थ, कोदंडराम मंदिर, वरदस्वामी मंदिर, राधाकृष्ण मंदिर, कपिलेश्वर देवालय, भगवान गोविंद, पद्मावती मंदिर येथे दर्शन घेतले व रेनिगुंट्यास परतलो.

रेनिगुंट्यावरून रेल्वे प्रवास सुरू झाला. मदुराईला आलो.

रेल्वे प्रवासात स्वयंपाक डबा असल्याने प्रवासादरम्यान आश्रमातील बाळासाहेब गोरडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तम प्रकारे नाश्ता, भोजन बनवून रेल्वेत डब्याडब्यात सेवा देत होते. प्रवासादरम्यान आयोजक सर्व भाविक प्रवास, स्थल दर्शनासाठी भाविकांना योग्य त्या सूचना देत होते. रेल्वे प्रवासात भाविकांना प. पू. सद्‌गुरूंच्या दर्शनाचा लाभ मिळत असे. तीर्थाटन करताना तेथील लोकांचे राहणीमान, लोकसंस्कृती, ठिकठिकाणी असलेली निसर्गसौंदर्यस्थळे यांचे अवलोकन करण्यात येत असे.

मदुराई येथे प्रसिद्ध मीनाक्षी मंदिर आहे. मंदिराभोवताली तटबंदी असून, चार ठिकाणी भव्य प्रवेशद्वारे आहेत. प्रवेशद्वारावर रामायण, महाभारतकालीन पौराणिक शिल्पे दगडात कोरली आहेत. श्रीगणेशदर्शन झाल्यावर सर्वांनी रांगेतून मीनाक्षी मंदिरात दर्शन घेतले. नंतर भगवान शंकराचे दर्शन घेतले. आवारात एक हजार दगडी खांबांचे दालन असून, त्यावर सुंदर शिल्पे कोरलेली आहेत. मदुराईत भाविकांनी काही वस्तू, वस्त्रांची खरेदी केली. सायंकाळी प्रसाद घेऊन रेल्वे स्टेशनला पोहचलो.

रात्री मदुराई स्टेशनवरून कन्याकुमारीकडे रेल्वे प्रस्थान झाले. सहा तासांच्या प्रवासानंतर कन्याकुमारीला आलो. पहाटेची वेळ होती.सर्वांना त्वरेने समुद्रसंगमावर जाण्यासाठी सूचना मिळाल्या. येथे अरबी समुद्र, हिंदवी महासागर व बंगालचा उपसागर असा त्रिवेणी संगम आहे. येथे आल्यावर मनोहारी सूर्योदय पाहता आता. अथांग सागराकडे पाहताना एक विलक्षण अनुभूती मनास जाणवत होती. समुद्रस्नान झाले. माता कन्याकुमारी देवीचे दर्शन घेतले व जवळच असलेल्या आद्यशंकराचार्य मंदिरात जाऊन वंदन केले.

नजीकच समुद्रात मोठ्या खडकावर स्वामी विवेकानंद यांचे प्रेक्षणीय स्मारक व ध्यानकेंद्र आहे. लाँचमधून तेथे जाऊन दर्शन घेतले व ध्यान केले. स्मारकाभोवती पसरलेल्या अथांग सागराकडे पाहतच रहावे, असे दृश्य होते.

नंतर १५ किमी अंतरावरील सुचिंद्रम या तीर्थक्षेत्री जाऊन भव्य हनुमान मूर्ती, श्रीगुरुमंदिर व नवग्रह मंदिराचे दर्शन घेतले व कन्याकुमारीस परतलो. सायंकाळी सूर्यास्त पाहिला. गांधी स्मारकास भेट दिली. रात्री कन्याकुमारी रेल्वे स्थानकावरून श्री रामेश्वरकडे निघालो.

श्री रामेश्वरनजीक पांभन येथील समुद्रपूल ओलांडून सकाळी गाडी रामेश्वरमला आली.

समुद्रस्नान झाल्यावर सर्वांनी रामेश्वराच्या प्रांगणातील २२ कुंड स्नानाचा आनंद घेतला. प्रसन्न अंतःकरणाने रामेश्वराचे दर्शन घेतले. रामेश्वर १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असून, चार धामांपैकी एक तीर्थक्षेत्र आहे. श्रीरामांनी येथून नजीक असलेल्या लंकेस जाण्यासाठी वानरसेनेच्या सहाय्याने रामसेतू बांधला. रामेश्वरला सेतूबंध मंदिर, रामकुंड, लक्ष्मणकुंड आदी ठिकाणे पाहून झाल्यावर मंदिराजवळ एका हॉलमध्ये सत्संग झाला. काही भाविकांनी प. पू. सद्‌गुरूंकडून अनुग्रह घेतला. प्रसाद घेऊन रात्री रामेश्वरवरून गाडीने बंगलोरकडे प्रयाण केले. १५ ते १६ तासांचा प्रवास करीत बंगलोरच्या यशवंत स्थानकावर गाडी पोहचली.

स्टेशनबाहेर २५ आरामगाड्यांचा ताफा तयार होता. त्यातून सर्वजण श्रवणबेळगोळ येथे आलो. रस्त्याच्या दुतर्फा नारळ, पोफळीच्या बागा, केळीच्या बागा होत्या. प्रवासादरम्यान विश्वशांती आश्रमातील भव्य श्रीकृष्ण मंदिर, गायत्री मंदिर, श्री सिद्धेश्वर देवालय पाहून श्रवणबेळगोळ या ठिकाणी पोहचलो. मुक्काम झाला. श्रवणबेळगोळ हे ठिकाण विंध्य पर्वतरांगेत आहे. या ठिकाणी उंच टेकडीवर ६५० दगडी पायऱ्या चढून गेल्यावर माथ्यावर ५६ फूट उंच बाहुबलीची मूर्ती आहे. मंडप आकारात प्रसिद्ध जैन तीर्थंकारांच्या इ. स. दहाव्या शतकातील मूर्ती आहेत. तलाव आदी प्रेक्षणीय स्थळे पाहून झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी बसमधून म्हैसूर शहराकडे निघालो. वाटेत श्रीरंगपट्टणम येथे कावेरी नदीच्या त्रिवेणी संगमानजीक श्रीरंगम येथे शेषशायी विष्णूंचे प्रसिद्ध देवालय पाहिले. पुढे आल्यावर टीपू सुल्तानाचा महाल व समाधी पाहिली. राष्ट्रीय पुराणवस्तू खात्याकडून जतन केलेल्या या स्थळी टीपू सुल्तानचा इतिहास चित्रस्वरुपात साकारला आहे.

म्हैसूरच्या अलीकडे डोंगरावर चामुंडादेवीचे मंदिर आहे. तेथे दर्शन घेतले. म्हैसूर शहर पाहिले. येथील म्हैसूर पॅलेस आणि राजघराण्याच्या वापरातील वस्तूंचे मोठे संग्रहालय पाहिले. सायंकाळी म्हैसूरचे प्रसिद्ध वृंदावन गार्डन पाहण्यासाठी गेलो. प्रशस्त जागेत मोठ्या प्रमाणात आकर्षक विद्युत रोषणाई, रंगीत कारंजे, लेझर शो पाहिला. सायंकाळी सर्वजण दीडशे किमीचा प्रवास करून पुन्हा बेंगलोरला आलो.

सत्संग यात्रेत ठिकठिकाणी सद्‌गुरूंच्या सहवासात सत्संग झाले. सत्संगात परमानंद महाराज, विवेकानंद महाराज, सदानंद महाराज, स्मृतिमाई व अन्य संतांची प्रवचने, भजने झाली, ध्यान झाले. बेंगलोरवरून दक्षिण भारत सत्संग यात्रेचा कोपरगावपर्यंतचा परतीचा प्रवासही आनंदाने पार पडला. सर्व भाविकांनी गुरुदेवांचे दर्शन घेऊन आपापल्या घराची वाट धरली. पंधरा-वीस वर्षांपूर्वीच्या या स्मरणीय सत्संग यात्रा त्यावेळी यात्रेला आलेल्या सर्वांच्या स्मृती जागवतील व अन्य जणांस प्रेरणा मिळेल.

**|| आत्मा मालिक ||**

**- बी. के. गायकवाड,**
नवमहाराष्ट्र हौसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे ९
मो. ९४०३०२६१६४

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

## विश्वात्मक सद्‌गुरूदेव : चेतना की अखंड महायात्रा



बाबाजी की साधना केवल बाहरी अनुशासन नहीं है; वह आत्मा की गहराइयों में उतरने वाली प्रक्रिया है। उनके जीवन में संयम, मौन, ध्यान और जागरूकता एक साथ प्रवाहित होते हैं। वे हर क्षण यह संदेश देते हैं कि साधना का अर्थ संसार से भागना नहीं, बल्कि स्वयं को इतना निर्मल बना लेना है कि मनुष्य का प्रत्येक कर्म ध्यान बन जाए। उनकी तपस्या कठोर दिखाई देती है, किंतु उसके भीतर करुणा की धारा प्रवाहित होती रहती है। वे शरीर को कष्ट देने के लिए तप नहीं करते ; वे आत्मा को जागृत करने के लिए तप करते हैं।

- नरेश यादव

धरती पर युगयुग में ऐसे महापुरुष अवतरित होते हैं, जिनके जीवन को केवल एक व्यक्ति का जीवन नहीं कहा जा सकता। वे समय की धड़कन बन जाते हैं। उनकी उपस्थिति केवल किसी आश्रम, किसी स्थान या किसी परंपरा तक सीमित नहीं रहती ; वे चेतना के रूप में समाज में प्रवाहित होने लगते हैं। विश्वात्मक सद्‌गुरूदेव जंगलीदास महाराज ऐसी ही दिव्य चेतना हैं। उनका जीवन तपस्या का प्रवाह है, उनका मौन साधना का संदेश है, और उनकी दृष्टि आत्मजागरण का आमंत्रण है।

जब वे नंगे पाँव धरती पर चलते हैं, तब ऐसा अनुभव होता है मानो स्वयं साधना मानवता के बीच उतर आई हो।

उनके चरण केवल मार्गों को स्पर्श नहीं करते ; वे मनुष्य के भीतर सोई हुई संभावना को जगाते हैं। उनकी उपस्थिति में व्यक्ति केवल श्रद्धा का अनुभव नहीं करता, बल्कि अपने भीतर छिपे हुए प्रकाश को भी महसूस करने लगता है।

बाबाजी का जीवन यह संकेत देता है कि आध्यात्मिकता कोई कल्पना नहीं, बल्कि अनुभव की जाने वाली वास्तविकता है। वे बाहरी वैभव से दूर रहकर यह सिद्ध करते हैं कि सच्चा वैभव भीतर की जागृति में निहित है। उनकी साधना मनुष्य को स्वयं की ओर लौटने का मार्ग दिखाती है।

### साधना की आंतरिक अग्नि :

बाबाजी की साधना केवल बाहरी अनुशासन नहीं है; वह आत्मा की गहराइयों में उतरने वाली प्रक्रिया है। उनके जीवन में संयम, मौन, ध्यान और जागरूकता एक साथ प्रवाहित होते हैं। वे हर क्षण यह संदेश देते हैं कि साधना का अर्थ संसार से भागना नहीं, बल्कि स्वयं को इतना निर्मल बना लेना है कि मनुष्य का प्रत्येक कर्म ध्यान बन जाए। उनकी तपस्या कठोर दिखाई देती है, किंतु उसके भीतर करुणा की धारा प्रवाहित होती रहती है। वे शरीर को कष्ट देने के लिए तप नहीं करते ; वे आत्मा को

जागृत करने के लिए तप करते हैं। उनकी दिनचर्या में अनुशासन है, किंतु उसमें कठोरता नहीं; उसमें जागरूकता है। वे बताते हैं कि मनुष्य का सबसे बड़ा संघर्ष बाहरी संसार से नहीं, बल्कि अपने भीतर के भय, मोह और अहंकार से है। इसी कारण वे आत्मविजय को सबसे बड़ी विजय मानते हैं। उनकी दृष्टि में वही साधक सफल है, जो अपने भीतर शांति और संतुलन स्थापित कर लेता है।

**वाणी जो भीतर तक उतरती है**

बाबाजी की वाणी में अद्भुत शक्ति है। वे बहुत कम बोलते हैं, किंतु उनके शब्द व्यक्ति के भीतर लंबे समय तक गूँजते रहते हैं। उनकी भाषा में शास्त्रीय जटिलता नहीं, बल्कि अनुभूति की सच्चाई होती है। वे सरल शब्दों में गहन सत्य प्रकट करते हैं।

जब वे किसी व्यक्ति से संवाद करते हैं, तब ऐसा प्रतीत होता है कि वे केवल उसके शब्द नहीं सुन रहे, बल्कि उसके भीतर की पीड़ा को भी पढ़ रहे हैं। वे अहंकार को तोड़ते हैं, क्योंकि वही मनुष्य और सत्य के बीच सबसे बड़ा आवरण है। किन्तु उसी क्षण उनकी करुणा व्यक्ति को संभाल भी लेती है। उनकी वाणी केवल प्रेरित नहीं करती; वह भीतर परिवर्तन उत्पन्न करती है। कई लोग उनके संपर्क में आकर अपने जीवन की दिशा बदल देते हैं। किसी के भीतर आशा जागती है, किसी के भीतर साहस, और किसी के भीतर आत्मविश्वास।

**पदयात्रा : चलती हुई साधना**

बाबाजी की पदयात्राएँ केवल यात्राएँ नहीं, बल्कि जागृति की गतिमान धारा हैं। जब वे नंगे पाँव गाँवों, नगरों और पगडंडियों से होकर गुजरते हैं, तब उनके साथ केवल लोग नहीं चलते; उनके साथ आशा चलती है, विश्वास चलता है और आत्मबोध की खोज चलती है।

वे स्वयं धरती को माता के रूप में स्पर्श करते हैं। उनके लिए पैदल चलना केवल साधन नहीं, बल्कि विनम्रता का अभ्यास है। वे बारबार यह अनुभव कराते हैं कि जो मनुष्य धरती से जुड़ा रहता है, वही आकाश की ऊँचाइयों को छू सकता है। उनकी यात्राओं में हजारों लोग सम्मिलित होते हैं। कोई श्रद्धा से आता है, कोई जिज्ञासा से, और कोई जीवन की पीड़ा से मुक्ति पाने की आशा में। किन्तु लौटते समय प्रत्येक व्यक्ति अपने भीतर कुछ नया लेकर लौटता है।

**वे वैद्य नहीं बल्कि चेतना के चिकित्सक हैं :**

लोग बाबाजी को वैद्य के रूप में भी जानते हैं, किंतु उनकी चिकित्सा केवल शरीर तक सीमित नहीं रहती। वे मनुष्य को संपूर्णता में देखते हैं। उनकी दृष्टि में शरीर, मन और आत्मा अलगअलग नहीं, बल्कि एक ही चेतना के आयाम हैं।

जब कोई व्यक्ति उनके पास आता है, तब वे केवल रोग नहीं देखते; वे उसके जीवन की स्थिति को समझते हैं। वे बताते हैं कि अशांत मन शरीर को भी असंतुलित कर देता है। इसी कारण वे ध्यान, संयम, प्रकृति और सकारात्मक चिंतन पर बल देते हैं।उनकी उपस्थिति ही लोगों को शांति का अनुभव कराती है। कई लोग केवल उनके दर्शन से ही मानसिक हल्कापन अनुभव करते हैं। यह केवल श्रद्धा नहीं; यह उस ऊर्जा का प्रभाव है जो उनकी साधना से निरंतर प्रवाहित होती रहती है।

**मौन की भाषा :**

बाबाजी का मौन भी एक उपदेश है। वे यह स्पष्ट कर देते हैं कि सत्य हमेशा शब्दों में नहीं उतरता। कई बार मौन ही वह माध्यम बनता है, जिसमें आत्मा स्वयं को सुन पाती है। उनके समीप बैठने वाला व्यक्ति अनुभव करता है कि धीरे धीरे उसके भीतर का शोर कम होने लगा है। मन शांत होने लगता है, विचारों की गति धीमी पड़ने लगती है और भीतर एक नई जागरूकता जन्म लेने लगती है। वे बारबार यह संकेत देते हैं कि मनुष्य जितना बाहर भागता है, उतना ही स्वयं से दूर हो जाता है। और जब वह भीतर लौटना प्रारंभ करता है, तभी वास्तविक यात्रा शुरू होती है।

**समाज में जागृति का प्रवाह :**

बाबाजी की साधना केवल व्यक्तिगत मुक्ति तक सीमित नहीं है। वे समाज को जागृत करने का कार्य कर रहे हैं। उनकी प्रेरणा से अनेक लोग सेवा, सहयोग और नैतिकता के मार्ग पर आगे बढ़ रहे हैं। उनके सत्संगों में धर्म की चर्चा नहीं होती; वहाँ जीवन की बात होती है। वे युवाओं को अनुशासन का संदेश देते हैं, परिवारों को प्रेम का महत्व समझाते हैं और समाज को सहयोग की शक्ति का अनुभव कराते हैं। वे बताते हैं कि यदि मनुष्य भीतर से जाग जाए, तो समाज अपने आप बदलने लगता है। इसलिए वे परिवर्तन की शुरुआत व्यक्ति से करते हैं.

**आध्यात्मिकता का सरल मार्ग :**

बाबाजी की सबसे बड़ी विशेषता यह है कि वे आध्यात्मिकता को सरल बना देते हैं। वे कठिन दार्शनिक शब्दों में उलझाने के स्थान पर जीवन के अनुभवों से सत्य को समझाते हैं।वे कहते हैं कि ध्यान केवल आँखें बंद कर बैठना नहीं; ध्यान वह अवस्था है, जिसमें मनुष्य जागरूक होकर जीता है। यदि भोजन करते समय जागरूकता है, यदि वाणी में करुणा है, यदि कर्म में ईमानदारी है-तो वह भी ध्यान है।

उनकी दृष्टि में धर्म का अर्थ विभाजन नहीं, बल्कि एकता है। वे हर व्यक्ति के भीतर परमात्मा का अंश देखते हैं। इसी कारण उनके समीप आने वाला व्यक्ति स्वयं को सम्मानित और स्वीकार किया हुआ महसूस करता है।

**आत्मबल और संकल्प :**

बाबाजी का जीवन यह सिद्ध करता है कि मनुष्य की सबसे बड़ी शक्ति उसका संकल्प है। बिना बाहरी साधनों के भी यदि आत्मबल जागृत हो जाए, तो असंभव प्रतीत होने वाले कार्य भी संभव हो जाते हैं। वे स्वयं कठिन परिस्थितियों में भी शांत और स्थिर रहते हैं। उनकी यह स्थिरता लोगों को प्रेरित करती है। वे बताते हैं कि परिस्थितियाँ मनुष्य को नहीं तोड़तीं; मनुष्य की आंतरिक दुर्बलता उसे तोड़ती है। इसी कारण वे आत्मविश्वास और आत्मानुशासन पर विशेष बल देते हैं। उनके अनुसार जिसने स्वयं को साध लिया, उसने संसार को साध लिया।

**एक जीवंत चेतना :**

विश्वात्मक सद्‌गुरूदेव जंगलीदास महाराज केवल एक संत नहीं, बल्कि वर्तमान समय में प्रवाहित होती हुई दिव्य चेतना हैं। उनकी साधना लोगों के भीतर जागृति का दीप प्रज्वलित कर रही है। उनकी वाणी लोगों को आत्मबोध की ओर ले जा रही है। उनकी पदयात्राएँ समाज को जोड़ रही हैं। वे इतिहास का विषय नहीं, अनुभव का विषय हैं। वे केवल स्मरण करने योग्य व्यक्तित्व नहीं, बल्कि जीने योग्य प्रेरणा हैं। उनका जीवन यह सिखाता है कि मनुष्य के भीतर अनंत प्रकाश विद्यमान है; आवश्यकता केवल उसे पहचानने की है।

जब भी कोई व्यक्ति उनके समीप पहुँचता है, वह केवल एक संत से नहीं मिलता; वह अपने भीतर छिपी हुई संभावनाओं से परिचित होने लगता है। यही उनकी वास्तविक महिमा है। यही कारण है कि उनकी उपस्थिति आज भी असंख्य हृदयों में आशा, शांति और आत्मजागरण का दीप प्रज्वलित कर रही है।वे बारबार यह संदेश देते हैं कि मनुष्य का वास्तविक विकास भीतर से प्रारंभ होता है। यदि विचार निर्मल हों, तो कर्म स्वतः पवित्र हो जाते हैं। यदि कर्म पवित्र हों, तो समाज में संतुलन और सद्भाव स्थापित होता है। इसी कारण वे आत्मअनुशासन को राष्ट्रनिर्माण की आधारशिला मानते हैं। उनकी दृष्टि में साधना केवल व्यक्तिगत मुक्ति का मार्ग नहीं, बल्कि सामूहिक चेतना को प्रकाशित करने की प्रक्रिया है-और इसी प्रक्रिया में आत्मा का सामूहिक ध्यान विश्वात्मक सद्‌गुरूदेव जंगलीदास महाराज की उपस्थिति में चेतना की अखंड महायात्रा बन गई है जो आत्मा के ध्यान की अखंड ज्योति के रूम में प्रज्वलित है और हमेशा रहेगी - आत्मा मालिक

**गुरुवर ज्योति अखंड हैं, ब्रह्मांड का नाद।**
**केवल अंदर साध लो, यही उनका प्रसाद।।**

**- नीता नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

।। आत्मा मालिक ।।



सस्नेह निमंत्रण

**आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण,**
**आत्मा मालिक ध्यान योग मिशन**

आयोजित

# ।। गुरुपौर्णिमा महोत्सव ।।

**दि. २३ जुलाई से २९ जुलाई २०२६**

## दिव्य दर्शन एवं सत्संग समारोह

## ।।अखंड अन्नदान।।

## श्री गुरुगीता कथा

**दि. २३ जुलाई से २७ जुलाई २०२६**

सभी भक्तों को सूचित किया जाता है कि प्रतिवर्ष की भांति इस वर्ष भी परम पूज्य सद्गुरु आत्मा मालिक माउली के पावन सानिध्य में कोकमठाण आश्रम में 'आत्मा मालिक गुरुपूर्णिमा महोत्सव' का आयोजन किया जा रहा है। इस समारोह में आध्यात्मिक परिवार के सभी संत, महंत, साधक और विभिन्न क्षेत्रों के गणमान्य व्यक्ति उपस्थित रहेंगे। अतः आप सभी से विनम्र अनुरोध है कि इस सत्संग समारोह में सम्मिलित होकर सद्गुरु कृपा और संत दर्शन का लाभ उठाएँ।



श्री श्री १००८ महामंडलेश्वर
प.पु. माँ कनकेश्वरी देवी जी

### कार्यक्रम स्थल

**आत्मा मालिक ध्यान योग मिशन**
**आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण,**
शिरडी कोपरगाँव रोड, मु. पो. कोकमठाण,
ता. कोपरगाँव, जि. अहिल्यानगर

मो. 9561480448, 8380039305, 8380039405

✻ प्रेषक ✻

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**
मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१